# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४८७

**अपिलार्थी डॉ. रमेश धर्मराज यादव**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
दिंडोशी विभाग, वर्धमान बिल्डिंग, वेस्टन एक्सप्रेस हायवे,
साईबाबा मंदिराजवळ, गोविंद नगर, मालाड (पू), मुंबई-४०० ०९७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-१२)**
शैलेंद्रनगर, दहिसर (पूर्व), मुंबई – ६८

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१०.२०२३ | ०१.०५.२०२४ | ११.१२.२०२३ | २६.०३.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.०३.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

अपिलार्थी यांनी दि. ३०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. १४.११.२०२२ रोजी वनराई पोलीस ठाणे येथे दिलेली तक्रारीवर केलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नाही म्हणून अपिलार्थींनी दि. ११.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०३.२०२४ रोजी अपिलार्थींच्या अर्जाची चौकशी लवकरात लवकर पूर्ण करुन अपिलार्थींना चौकशीची माहिती देण्याचे आदेशित केले होते. त्याअनुषंगाने अपिलार्थींच्या अर्जाची चौकशी करुन दि. ०१.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना कळविण्यात आले होते की, त्यांच्या तक्रारीची चौकशी करण्यात आली असून त्यामध्ये कोणतीही फौजदारी गुन्ह्याचे तथ्य आढळून येत नसल्याने सदरचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०५.२०२४ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थींनी स्विकारल्याची पोहोच आयोगासमोर सादर केली.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 10-9-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १०.०९.२०२५**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते